MUTUALFUNDS
Sahi Hai

SHRIRAM
Mutual Fund
GOALS ANEK, MUTUAL FUND EK




# अनक्लेम्ड म्युच्युअल फंड्सविषयी वारंवार विचारले जाणारे प्रश्न

**आपले पैसे, आपला हक्क**

→

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

प्रश्न 1

# “अनक्लेम्ड अमाउंट” म्हणजे काय?

म्युच्युअल फंड्सकडून गुंतवणूकदारांना रिडेम्प्शन, मॅच्युरिटी किंवा डिव्हिडंडच्या स्वरूपात पैसे दिले जातात. हे पेमेंट गुंतवणूकदारांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदणीकृत बँक खात्यात किंवा उपलब्ध नोंदींनुसार गुंतवणूकदाराच्या नोंदणीकृत पत्त्यावर चेक पाठवून दिले जातात.

जेव्हा म्युच्युअल फंडाकडून दिलेले पैसे, गुंतवणूकदाराचे बँक खाते बदलल्यामुळे, खाते बंद झाल्यामुळे, रेकॉर्डमध्ये खात्याची माहिती अपूर्ण असल्यामुळे, चेक न मिळाल्यामुळे किंवा बँकेत जमा न केल्यामुळे, किंवा पत्ता अपडेट केलेला नसल्यामुळे, त्याच्या खात्यात जमा होत नाहीत किंवा त्याला मिळत नाहीत, तेव्हा अशा रकमेला 'अनक्लेम्ड अमाउंट' (दावा न केलेली रक्कम) मानले जाते.

गुंतवणूकदारांचे KYC झालेले नसेल तर त्यांना पैसे देता येत नाहीत. त्यामुळे अशी रक्कम पेमेंटच्या दिवशीच थेट ‘अनक्लेम्ड स्कीम’मध्ये जमा केली जाते.

→

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

SHRIRAM Mutual Fund
GOALS ANEK, MUTUAL FUND EK

प्रश्न 2

# गुंतवणूकदारांना त्यांच्या नावावर म्युच्युअल फंड्समध्ये काही अनक्लेम्ड रक्कम आहे का, हे कसे कळेल?

अनक्लेम्ड रकमेची माहिती ॲसेट मॅनेजमेंट कंपनी (AMC) आणि रजिस्ट्रार अँड ट्रान्स्फर एजंट (RTA) यांच्या वेबसाइटवर उपलब्ध असते.

गुंतवणूकदार www.mfcentral.com या एमएफ सेंट्रलच्या (MF Central) वेबसाइटवर जाऊनही ही माहिती तपासू शकतात. तिथे आपली अनक्लेम्ड रक्कम पाहण्यासाठी, त्यांना आपला यूजर आयडी, पासवर्ड किंवा OTP वापरून लॉग-इन करावे लागेल आणि आवश्यक तपशील द्यावे लागतील.

गुंतवणूकदारांना पाठवण्यात येणाऱ्या कन्सॉलिडेटेड अकाउंट स्टेटमेंटमध्ये (CAS) सुद्धा, न मिळालेल्या किंवा अनक्लेम्ड रकमेची माहिती दिलेली असते.

म्युच्युअल फंड्सकडून गुंतवणूकदारांना त्यांच्या अनक्लेम्ड रकमेबाबत वेळोवेळी स्मरणपत्रे किंवा सूचना पाठवल्या जातात.

→

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

प्रश्न 3

# म्युच्युअल फंड इन्व्हेस्टमेंट ट्रेसिंग अँड रिट्रिव्हल असिस्टंट (MITRA) म्हणजे काय आणि ते अनक्लेम्ड रक्कम ओळखण्यात कसे मदत करते?

---

मित्रा (MITRA) हे गुंतवणूकदारांना त्यांच्या निष्क्रिय आणि अनक्लेम्ड म्युच्युअल फंड गुंतवणुकीचा मागोवा घेण्यासाठी मदत करणारे एक सेवा प्लॅटफॉर्म आहे. निष्क्रिय फोलिओ म्हणजे असा फोलिओ, जिथे गेल्या १० वर्षांत गुंतवणूकदाराकडून कोणताही व्यवहार (आर्थिक किंवा गैर-आर्थिक) झालेला नसतो, पण त्या फोलिओमध्ये युनिट बॅलन्स शिल्लक असतो.

मित्रा (MITRA) वापरण्यासाठी, एमएफ सेंट्रलच्या (MF Central) **www.mfcentral.com** या वेबसाइटवर जाऊन होम पेजवरील 'MITRA' लिंकवर क्लिक करावे. येथे गुंतवणूकदार विविध माहिती (search parameters) भरून आपली अनक्लेम्ड किंवा निष्क्रिय गुंतवणूक शोधू शकतात. जर दिलेली माहिती निष्क्रिय आणि अनक्लेम्ड रेकॉर्डशी जुळली, तर गुंतवणूकदारांना त्या म्युच्युअल फंडाचे नाव दाखवले जाते जिथे त्यांची गुंतवणूक आहे. त्यानंतर, गुंतवणूकदार आपली अनक्लेम्ड रक्कम क्लेम करण्यासाठी संबंधित म्युच्युअल फंड किंवा RTA शी संपर्क साधू शकतात. क्लेम करण्याची प्रक्रिया आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) यांची माहितीसुद्धा मित्रा (MITRA) वर उपलब्ध आहे.

→

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

प्रश्न 4

# गुंतवणूकदार अनक्लेम्ड रक्कम कशी मागू शकतात?

गुंतवणूकदार AMC च्या वेबसाइटवर उपलब्ध असलेला फॉर्म डाउनलोड करून, त्यावर सही करून तो AMC/RTA च्या कार्यालयात सादर करू शकतात. रेकॉर्डची पडताळणी आणि सही जुळल्यानंतर, अनक्लेम्ड रक्कम 'अनक्लेम्ड डिव्हिडंड अँड रिडेम्प्शन स्कीम' (UDRS) मधून, त्यावर लागू असलेल्या वाढीसह, दिली जाते.

क्लेम प्रक्रियेबाबत काही शंका असल्यास, गुंतवणूकदार संबंधित AMC च्या RTA शी संपर्क साधू शकतात (ज्या AMC मध्ये त्यांची अनक्लेम्ड रक्कम आहे). दोन्ही RTA चे संपर्क तपशील त्यांच्या वेबसाइटवरील “संपर्क करा” विभागात उपलब्ध आहेत.

**KFIN:** https://www.kfintech.com/contact-us/
**CAMS:** https://www.camsonline.com/contactus

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

SHRIRAM Mutual Fund
GOALS ANEK, MUTUAL FUND EK

प्रश्न 5

# जर अनक्लेम्ड रक्कम न मिळाल्यास गुंतवणूकदार तक्रार कुठे नोंदवू शकतात?

जर गुंतवणूकदाराला पेमेंट किंवा रिजेक्शनबाबतचे कळवणारे पत्र 7 कामकाजाच्या दिवसांत मिळाले नाही, तर त्यांनी संबंधित AMC/RTA च्या कार्यालयाशी किंवा AMC च्या कॉन्टॅक्ट सेंटरशी संपर्क साधून तक्रार नोंदवावी. तक्रार नोंदवण्यासाठी लागणारे कॉन्टॅक्ट सेंटरचे तपशील आणि AMC चा ईमेल आयडी त्यांच्या वेबसाइटवरील “संपर्क करा” विभागात उपलब्ध असतात. जर AMC/RTA ने ठरलेल्या वेळेत किंवा गुंतवणूकदाराच्या समाधान होईल अशा प्रकारे तक्रार सोडवली नाही, तर ती तक्रार सेबी (SEBI) च्या स्कोर्स (SCORES) पोर्टलवर पुढे पाठवता येते.

→

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

SHRIRAM
Mutual Fund
GOALS ANEK, MUTUAL FUND EK

प्रश्न 6

# गुंतवणूकदाराने दावा करेपर्यंत म्युच्युअल फंड्स अनक्लेम्ड रक्कम कुठे गुंतवतात?

म्युच्युअल फंडांना अनक्लेम्ड रक्कम, कॉल मनी मार्केट, मनी मार्केट इन्स्ट्रुमेंट्स किंवा ओव्हरनाईट स्कीम, लिक्विड स्कीम किंवा मनी मार्केट म्युच्युअल फंडांच्या स्वतंत्र योजनेत गुंतवण्याची परवानगी असते. या गुंतवणुकींमध्ये साधारणतः भांडवली जोखीम खूप कमी असते आणि काही प्रमाणात परतावा (रिटर्न) सुद्धा मिळतो. अनक्लेम्ड रक्कम गुंतवण्यासाठी म्युच्युअल फंडांकडून खास तयार केलेल्या या स्वतंत्र योजनेला 'अनक्लेम्ड डिव्हिडंड/रिडेम्प्शन स्कीम' (UDRS) म्हणून ओळखले जाते.

→

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

SHRIRAM Mutual Fund
GOALS ANEK, MUTUAL FUND EK

प्रश्न 7

## अनक्लेम्ड रकमेवरील वाढ गुंतवणूकदारांना कशी दिली जाते?

अनक्लेम्ड रक्कम लिक्विड किंवा ओव्हरनाईट स्कीम्स मध्ये गुंतवलेली असल्याने, वाढ AMC कडून दररोज जाहीर होणाऱ्या NAV (नेट ॲसेट व्हॅल्यू) च्या स्वरूपात असते. ही वाढ गुंतवणूकदारांना युनिट तयार झाल्याच्या तारखेपासून 3 वर्षांच्या कालावधीत दिली जाते. 3 वर्षांनंतरची वाढ इन्व्हेस्टर एज्युकेशन फंडमध्ये जमा करण्यात येते.

प्रश्न 8

## UDRS मध्ये वाटप (अलॉटमेंट) किती वेळाने केले जाते?

अनक्लेम्ड डिव्हिडंड/रिडेम्प्शन स्कीम (UDRS) मध्ये वाटप साप्ताहिक किंवा पंधरवड्याने केले जाते. हे बँकांकडून अनपेड इन्स्ट्रुमेंट्सची माहिती मिळण्याच्या वारंवारतेवर अवलंबून असते.

→

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

SHRIRAM
Mutual Fund
GOALS ANEK, MUTUAL FUND EK

प्रश्न 9

# गुंतवणूकदारांनी आपली रक्कम अनक्लेम्ड होऊ नये यासाठी काय करावे?

गुंतवणूकदारांनी ज्या RTA/AMC कडे त्यांची गुंतवणूक आहे, तिथे आपली माहिती, जसे की PAN, KYC, पत्ता, बँक खात्याचा तपशील इत्यादी नेहमी अपडेटेड ठेवावा. युनिट्स रिडीम करताना, गुंतवणूकदारांनी आपले बँक खाते तपासून रक्कम जमा झाली आहे का, हे पाहावे. जर इलेक्ट्रॉनिक क्रेडिटच्या बाबतीत (जिथे CBS A/c नंबर आणि IFS कोडसह बँक खात्याचा पूर्ण तपशील दिलेला असतो) रक्कम 3 कामकाजाच्या दिवसांत मिळाली नाही, किंवा चेकद्वारे 5-7 कामकाजाच्या दिवसांत मिळाली नाही, तर गुंतवणूकदारांनी जवळच्या RTA/AMC कार्यालयाशी किंवा आपल्या डिस्ट्रिब्युटरशी संपर्क साधावा.

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

SHRIRAM Mutual Fund
GOALS ANEK, MUTUAL FUND EK

## क्लेम प्रक्रियेसाठी मानक कार्यपद्धती (SOP)

1. अनक्लेम्ड रक्कम मागण्यासाठी, गुंतवणूकदाराने संबंधित ॲसेट मॅनेजमेंट कंपनी (AMC) किंवा रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट (RTA) यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा त्यांच्या वेबसाइटवर जाऊन फॉर्म डाउनलोड करावा. हा फॉर्म संबंधित RTA/AMC च्या कार्यालयात सादर करावा. RTA सही आणि इतर तपशीलांची पडताळणी करून, सर्व काही व्यवस्थित असल्यास अर्जावर पुढील प्रक्रिया करतो. जर फॉर्ममध्ये काही त्रुटी असतील किंवा सही जुळत नसेल, तर RTA गुंतवणूकदाराला एक सूचना पाठवतो, ज्यामध्ये अर्ज नाकारण्याचे कारण आणि गुंतवणूकदाराने पुढे कोणती कारवाई करायची आहे, याची माहिती दिलेली असते.

2. अनक्लेम्ड स्कीममधून होणारे पेमेंट रिडेम्प्शनप्रमाणेच हाताळले जाते. त्यामुळे लागू असलेली नेट ॲसेट व्हॅल्यू (NAV) ही फॉर्म प्राप्त झाल्याच्या दिनांक आणि वेळेनुसार लागू केली जाते. पेमेंट साधारणतः 2 ते 5 दिवसांच्या आत केले जाते.

→

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

# रिडेम्प्शन पेमेंट्स – मूल्यनिर्धारण पद्धत

1. **परिस्थिती A –** 3 वर्षांच्या आत दिलेल्या पेमेंट्ससाठी: रिडेम्प्शनची प्रक्रिया अनक्लेम्ड डिव्हिडंड अँड रिडेम्प्शन स्कीम (UDRS) मधून, त्या स्कीमला मिळालेल्या वाढीसह, लागू असलेल्या NAV नुसार केली जाते.

2. **परिस्थिती B –** 3 वर्षांनंतर दिलेल्या पेमेंट्ससाठी: 3 वर्षांनंतरची वाढ इन्व्हेस्टर एज्युकेशन फंडमध्ये जमा केली जाते आणि रिडेम्प्शनची प्रक्रिया, अनक्लेम्ड स्कीममध्ये युनिट तयार झाल्याच्या तारखेपासून 3 वर्षांच्या अखेरीस असलेल्या मूल्याच्या आधारावर केली जाते.

3. **परिस्थिती C –** फोलिओवरील पुढील व्यवहार किंवा अपडेट: जर फोलिओशी संबंधित अशी कोणतीही नवीन माहिती मिळाली, ज्यामुळे अनक्लेम्ड रक्कम देणे शक्य होईल, तर रिडेम्प्शनची प्रक्रिया अनक्लेम्ड स्कीम्समधून आपोआप केली जाते आणि ती रक्कम गुंतवणूकदाराला दिली जाते.

→

**म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.**